# - प्रेस नोट -

दि. ०२/०९/२०२६

## आझाद मैदान पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.०१/०९/२०२६ रोजी ०३.०० ते ०३.०५ वा.च्या दरम्यान फिर्यादी विकास बाळू कारंडे, वय-२५ वर्षे, धंदा-कॅटरींग काम,रा.ठी.काजुपाडा बोरीवली(पू), मुंबई हे चर्चगेट रेल्वे स्टेशन, गेट क्रमांक ०४ चे समोरील फुटपाथवर, एम.के.रोड चर्चगेट(पू), मुंबई येथे दोन इसमांचे वाद चालु असताना फिर्यादी त्यांच्याकडे बघत असल्याचा राग मनात धरून अटक आरोपी पुरूष वय- २५ वर्षे, याने फिर्यादीला जिवे ठार मारण्याच्या उद्‌देशाने त्याचे हातातील फुटलेली काचेची बाटली फिर्यादीच्या गळयावर उजव्या बाजुस मारून फिर्यादीला जखमी केले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०१/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. २५४/२६, कलम १०९(१) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------